(इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णयाचा मराठी भाषेत अनुवाद )

**मुंबई उच्च न्यायालय**

**फौजदारी अपिलीय अधिकारिता**

**फौजदारी पुनरीक्षण याचिका क्रमांक.५१४/२०२४**

**सोबत**

**अंतरिम अर्ज क्रमांक.३७८४/२०२४**

**मध्ये**

**फौजदारी पुनरीक्षण याचिका क्रमांक.५१४/२०२४**

निसार अब्दुल शेख ........अर्जदार

(मूळ आरोपी क्रमांक.१)

**- विरुद्ध -**

महाराष्ट्र राज्य आणि एक .....उत्तरवादी

अर्जदारासाठी वकील:- श्री. महेंद्र चंदनशिव सोबत श्री. दुष्यंत पगारे.

उत्तरवादी क्रमांक.१ -राज्यासाठी:- ए.पी.पी सुश्री.मनीषा आर तिडके.

उत्तरवादी क्रमांक.२ साठी वकील:- श्री.विकास शिवारकर .

**कोरम:- न्यायमूर्ती मिलिंद एन. जाधव,**

**दिनांक:- डिसेंबर २०,२०२४**

**<u>मौखिक न्यायनिर्णय:-</u>**

**१.** अर्जदारासाठी विद्वान वकील श्री. चंदनशिव, उत्तरवादी क्रमांक.१- राज्यासाठी विद्वानए.पी.पी सुश्री.तिडके आणि उत्तरवादी क्रमांक .२ साठी विद्वान वकील श्री.शिवारकर यांचे म्हणणे ऐकले.

**२.** सध्याचा फौजदारी पुनरीक्षण अर्जात (थोडक्यात "**सीआरए**") दिनांक १३.१०.२०१४ रोजी विद्वान ट्रायल कोर्टाने आणि विद्वान दिनांक ०६.०८.२०२४ रोजी अपिलीय न्यायालयाने पारित केलेल्या दोन समवर्ती न्यायनिर्णयाला आव्हान दिले आहे. पुनरीक्षण अर्जदाराला भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम ३२६ (थोडक्यात "**आयपीसी**".) अंतर्गत दोषी ठरवण्यात आले आहे आणि त्याला एक वर्ष सश्रम कारावासाची आणि ३०००/- रुपये दंडाची शिक्षा सुनावण्यात आली आहे आणि कसूर केल्यास त्याला दोन महिन्यांचा सश्रम कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे.

**३.** विद्वान वकील श्री.शिवारकर पीडितेच्या वतीने उपस्थित आहे. दिनांक १४.१०.२०२४ रोजीच्या पुनरीक्षण कार्यवाहीत शामिल होण्यासाठी त्यांनी न्यायालयाकडे प्रतिकथन केले. त्यांनी न्यायालयाला कळविले की पीडित आणि पुनरीक्षण अर्जदार यांनी तडजोड करण्यास सहमती दर्शविली आहे आणि म्हणून त्यांना संमतीच्या अटी दाखल करायच्या आहेत. अर्जदाराचे विद्वान वकील श्री. चंदनशिव यांनी श्री. शिवारकर यांच्या

प्रतिकथनाचे समर्थन केले. दोन्ही विद्वान वकिलांनी या प्रकरणाच्या गुणवत्तेवर आपले म्हणणे मांडले आहे. मी राज्याच्या वतीने विद्वान एपीपी सुश्री टिडके यांचे म्हणणेही ऐकले आहे आणि रेकॉर्डचे अवलोकन केले आहे.

**४.** थोडक्यात, या प्रकरणाची तथ्ये अशी आहेत की पीडित आणि अर्जदार (आरोपी) हे जवळचे नातेवाईक आहेत. दिनांक १७.०४.२०१० पीडित आणि त्याची पत्नी (प्रथम माहिती देणारी) दुपारी ०१:०० वाजता त्यांच्या शेतातील कांद्याच्या पिकासाठी समान कुटुंबाच्या विहिरीतून पाणी काढत असताना आरोपी क्रमांक.२ आणि ४ (कुटुंबातील सदस्य) यांनी त्यांना अडवले आणि त्यांना पाणी काढण्यापासून रोखले.

**४.१** दोन्ही बाजूंमध्ये शाब्दिक आणि शारीरिक भांडण झाले, ज्यामुळे आरोपीने पीडितेच्या पत्नीला झापड मारली, जेव्हा आरोपी क्रमांक.१ आणि ३ घटनास्थळी पोहोचले आणि आरोपी क्रमांक.१ ने लोखंडी रॉड उचलले आणि पीडितेच्या डोक्यावर वार केला तेव्हा तिचा पती म्हणजेच पीडितेने ताबडतोब हस्तक्षेप केला. पीडितेच्या डोक्याला दुखापत झाली. आरोपींनी पीडितेला जिवे मारण्याची धमकीही दिली.

**४.२** पीडितेच्या पत्नीने त्याच दिवशी कुटुंबातील ४ आरोपी सदस्यांविरोधात प्रथम माहिती अहवाल (थोडक्यात '**एफआयआर.**') दाखल केला. गुन्हा क्रमांक.९६/२०१० नोंदवला गेला. अर्जदारासह (आरोपी क्रमांक.१ ) ४ आरोपींविरोधात आरोपपत्र दाखल

करण्यात आले. पूर्ण सुनावणीनंतर, आरोपी क्रमांक.२ ते ४ यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली, तर अर्जदाराला (आरोपी क्रमांक.१ ) आयपीसीच्या कलम ३२६ अंतर्गत दोषी ठरवण्यात आले आणि शिक्षा सुनावण्यात आली.

**४.३** ट्रायल कोर्टाच्या दिनांक १३.१०.२०१४ रोजीचा न्यायनिर्णय अर्जाच्या पृष्ठ क्रमांक.३२ वर जोडला आहे. अर्जदाराने फौजदारी अपील क्रमांक.४६/२०१४ अपीलीय न्यायालया म्हणजेच सत्र न्यायालया समोर दाखल केले, जे दिनांक ०६.०८.२०२४ रोजीच्या आक्षेपित न्यायनिर्णयाद्वारे फेटाळण्यात आले. वरील दोन्ही समवर्ती निर्णय सध्याच्या सी. आर. ए. मध्ये आव्हानात्मक विषय आहेत.

**५.** मला सांगण्यात आले आहे की पक्ष हे जवळचे रक्त नातेवाईक आहेत आणि त्यांनी न्यायालयाबाहेर सौहार्दपूर्णपणे वाद मिटवला आहे आणि त्यांची एकमेकांशी कोणतीही तक्रार नाही.

**६.** अर्जदारासाठी विद्वान वकील श्री.चंदनशिव यांनी न्यायालयाला कळवले आहे की पीडितेने-पी.डब्ल्यू-५ ने दिनांक २१.११.२०२४ रोजी प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे, जे पुष्टी करते की त्याने आणि अर्जदाराने त्यांचे प्रकरण न्यायालयाबाहेर सौहार्दपूर्णपणे मिटवला आहे आणि आयपीसीच्या कलम ३२६ अंतर्गत गुन्हा हा आपसात मिटण्याजोगा अपराध नसल्यामुळे हे प्रकरण आपसात मिटवण्यात त्यांना कोणताही आक्षेप नाही.

दोन्ही पक्षांनी सध्याच्या सीआरए मध्ये  समझोता करण्यास सहमती दर्शवली आहे. समझोता लक्षात घेता, दोन्ही वकील असे सादर करतील की या न्यायालयाने दंड प्रक्रिया संहिता, १९७३ (थोडक्यात "**सीआर.पीसी** ") च्या कलम ४८२ सह वाचन केलेल्या कलम ३९७ अंतर्गत आपल्या अधिकाराचा वापर करावा.

**७.** अर्जदाराचे विद्वान वकील श्री. चंदनशिव गुणवत्तेनुसार असे सादर करतात की जर सध्याच्या प्रकरणातील तथ्यांची रेकॉर्ड वर असलेल्या पुराव्यांवरून छाननी केली गेली तर हे स्पष्ट आहे की हे आयपीसीच्या कलम ३२३ अंतर्गत साध्या दुखापतीचे प्रकरण असू शकते आणि आयपीसीच्या कलम ३२६ अंतर्गत गंभीर दुखापतीचे प्रकरण नाही. त्यांनी सादर केले की विशिष्ट दिवशी विहिरीचे पाणी काढण्याच्या संदर्भात पक्षांमधील शाब्दिक वादामुळे हा गुन्हा क्षणार्धात झाला आणि पीडितेला दुखापत किंवा हानी पोहोचवणे हे अर्जदाराचे पूर्वनियोजित कृत्य नव्हते. लोखंडी रॉडने दुखापत झाली हे अभियोग पक्षाचे प्रकरण असले तरी तपास अधिकाऱ्याने (थोडक्यात "**आयओ**") ती जप्त केलेली नाही, असे त्यांनी सादर केले. त्यामुळे, लोखंडी रॉड  हे अर्जदाराने वापरलेले शस्त्र होते की नाही हे अत्यंत संशयास्पद आणि शंकास्पद आहे आणि ही शक्यता नाकारता येत नाही.

**८.** पुढे त्यांनी सादर केले की अभियोग पक्षांच्या साक्षीदारांपैकी कोणीही त्यांच्या पुराव्यामध्ये साक्ष दिली नाही की आरोपी क्रमांक.१ हा पीडितेला मारहाण करण्यासाठी पूर्वनियोजित मनाने लोखंडी रॉड घेऊन घटनास्थळी पोहोचला. त्यांनी सादर केले की

पी.डब्ल्यु-४ म्हणजे पीडितेच्या पत्नीचा पुरावा, जी पहिली माहिती देणारी आहे, ती महत्त्वाची आहे कारण ती या घटनेची प्रत्यक्ष साक्षीदार आहे. त्यांनी तिच्या साक्षीकडे माझे लक्ष वेधले आणि ते अवलोकन केल्यानंतर सादर केले की तिने असे म्हटले नाही की आरोपी क्रमांक.१ ने तिच्या पतीला म्हणजेच पीडितेला दुखापत करण्यासाठी लोखंडी रॉडचा वापर केला. त्यांनी सादर केले की कथित शस्त्राचा (लोखंडी रॉड) जप्ती पंचनामा नसल्यामुळे आणि पी. डब्ल्यू.-४ या प्रथम माहिती देणाऱ्या प्रत्यक्ष साक्षीदाराची साक्षी नसल्यामुळे, अभियोग पक्षाचा खटला सर्व वाजवी शंकांच्या पलीकडे सिद्ध केला जाऊ शकत नाही. त्यांनी सादर केले की अभियोग पक्षाने अर्जदाराला दोष देण्यासाठी आणि दोषी ठरवण्यासाठी केवळ वैद्यकीय पुराव्यावर भर दिला आहे, जे कोणत्याही स्वतंत्र साक्षीदाराच्या साक्षीद्वारे समर्थित नाही. अशा प्रकारे, अभियोग पक्षाचे प्रकरणात तीव्र अनिश्चितता आहे ज्याची पुष्टी केली जात नाही. त्यानंतर त्यांनी पीडब्ल्यू-५ म्हणजेच स्वतः पीडितेच्या साक्षीकडे माझे लक्ष वेधले आणि अर्जदाराने (आरोपी क्रमांक १) त्याला लोखंडी रॉडने जखमी केले आहे की नाही याबद्दल त्याला दिलेल्या स्पष्ट सूचनोवर त्याने या प्रश्नाचे नकारार्थी उत्तर दिले आहे. त्यामुळे, त्यांनी सादर केले की दोन्ही विद्वान न्यायालयांनी स्वतंत्र साक्षीदाराच्या कोणत्याही ठोस पुराव्याशिवाय चुकीचा निष्कर्ष काढला आहे की आरोपी क्रमांक.१ हा पीडितेला शस्त्राने झालेल्या दुखापतीसाठी जबाबदार होता आणि म्हणून ते या न्यायालयाच्या पुनरीक्षणात्मक अधिकारक्षेत्रात

हस्तक्षेप करण्याची मागणी करते.

९. श्री. चंदनशिव यांनी सादर केलेल्या वरील निवेदनांना श्री. शिवारकर यांचे योग्य समर्थन आहे. त्यामुळे ते दोघेही एकत्रितपणे न्यायालयाला विनंती केली की पक्षकारांद्वारे झालेल्या सौहार्दपूर्ण समझोत्याचा विचार करावा आणि गुन्ह्याबाबत समझोता करावा.

१०. रेकॉर्डचे अवलोकन केल्यानंतर असे दिसून येते की पक्षांनी त्यांचा वाद सलोख्याने मिटवला आहे या वस्तुस्थितीबद्दल कोणताही वाद नाही. त्यांच्या वकिलांनी या वस्तुस्थितीला पुष्टी केली आहे. पीडितेने प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे आणि ते रेकॉर्डवर आणले गेले आहे, ज्यामध्ये असे म्हटले आहे की पक्षकारांनी न्यायालयाबाहेर सलोख्याने प्रकरण मिटवले आहे आणि पीडितेला स्वतः हे प्रकरण आपसात मिटविण्यास कोणताही आक्षेप नाही. तथापि, आयपीसी च्या कलम ३२६ अंतर्गत दंडनीय गुन्हा आपसात मिटविण्याजोगा नाही. याबाबत कोणतीही शंका नाही.

११. अर्जदाराचे विद्वान वकील श्री. चंदनशिव यांनी मात्र जोरदार युक्तिवाद केला आहे की अन्यथा, अभियोग पक्षाच्या पुराव्यातील दुर्बलता आणि कथित धोकादायक शस्त्राचा पंचनामा नसल्याने अर्जदाराला आयपीसीच्या कलम ३२६ अंतर्गत दोषी ठरवले जाऊ शकत नाही. त्यामुळे गुणवत्तेनुसार, त्यांनी न्यायालयाला सादर केले आणि आय. पी. सी. च्या कलम ३२३ अंतर्गत आरोपात बदल करण्याची आणि पक्षांना आपसात

समझोता करण्याची परवानगी देण्याची विनंती केली.

**१२.** अभिलेखातील पुराव्यांवरून असे सूचित होते की आरोपी क्रमांक.१ ने लोखंडी रॉडचा वापर केला होता, परंतु तो जप्त करण्यात आलेला नाही. या प्रकरणात वैद्यकीय पुराव्याला महत्त्वपूर्ण गृहीत धरले आहे. पीडब्ल्यू-६ हे डॉक्टर आहेत ज्यांनी पीडितेवर उपचार केले. जेव्हा पीडितेला रुग्णालयात आणण्यात आले, तेव्हा त्याच्या डोक्याला दुखापत झाली होती, उजव्या बाजूच्या पॅरिटल भागावर सी. एल. डब्ल्यू. आणि फ्रॅक्चर झालेल्या कार्टिलेजसह डावे कान चिरडले होते, असे त्याने सांगितले आहे. तथापि, त्याच्या उलटतपासणीत डॉक्टरांनी असे मत व्यक्त केले आहे की एक्स रे काढल्यानंतर फ्रॅक्चर दिसू शकते आणि अन्यथा नाही. पुढे त्यांच्या उलट तपासणीमध्ये, त्यांनी उत्तर दिले आहे की डोक्याला झालेली दुखापत सी-टी स्कॅन केल्यानंतरच शोधली जाऊ शकते परंतु त्यांनी पोलिसांना कोणताही सी-टी स्कॅन अहवाल दिला नाही. त्यांच्या उलटतपासणीत त्याने केवळ तोंडी साक्ष दिली आहे आणि पीडितेला दिलेल्या कोणत्याही उपचाराबाबत त्याने कोणतीही कागदपत्रे आणलेली नाहीत हे सत्य मान्य केले आहे. जर एखादी व्यक्ती शेतजमिनीच्या कठीण पृष्ठभागावर पडली तर पीडित व्यक्तीला झालेली दुखापत देखील शक्य आहे, असे त्यांनी स्पष्टपणे स्पष्ट केले आहे.

**१३.** उपरोक्त वैद्यकीय पुराव्यांवर अवलंबून राहून, अर्जदारावर दोषारोप आणि दोषसिद्धीचा निर्णय घेतला जातो. आरोपी क्रमांक.१ म्हणजे अर्जदाराने केवळ पाणी

सहभागिता वादामुळेच गंभीर गुन्हा केला आहे आणि जर आरोपीला दयाळूपणा दाखविला गेला तर तो समाजाला चुकीचा संकेत देईल आणि त्यामुळे आरोपीला दयाळूपणा दाखवता येणार नाही, असा निष्कर्ष विद्वान खटल्याच्या न्यायालयाने दिनांक १३.१०.२०१४ रोजीच्या न्यायनिर्णयात काढला. समाजाला संकेत देण्यासाठी आरोपीला दंडात्मक शिक्षा देण्याचा विद्वान ट्रायल कोर्टाचा हा निष्कर्ष आणि समर्थन ही योग्य पद्धत नाही ज्यामध्ये फौजदारी न्यायशास्त्र लागू करणे आवश्यक आहे. फौजदारी न्यायशास्त्रात न्यायालयासमोर ठेवलेला आणि अभियोग पक्षाने सिद्ध केलेला पुरावा आणि तो कायद्याच्या तरतुदींशी सुसंगत आहे की नाही हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

**१४.** या प्रकरणातील तथ्ये आणि पुरावे आणि अभियोग पक्षाने आरोपीला अभ्यारोप करण्यासाठी आणि दोषी ठरवण्यासाठी सर्व वाजवी शंकांच्या पलीकडे आपले प्रकरण सिद्ध केले आहे की नाही हे पूर्णपणे सिद्ध करणे आवश्यक आहे. केवळ गंभीर दुखापतीमुळे आणि समाजाला संकेत पाठवण्यासाठी आरोपीला कोणतीही दयाळूपणा दाखवता येऊ नये, हा दोषसिद्धीच्या निष्कर्षावर पोहोचण्याचा आधार असू शकत नाही आणि असू नये.

**१५.** पीडब्ल्यू-४ चा पुरावा स्पष्टपणे नोंदवतो की जेव्हा भांडण झाले तेव्हा अनिल बच्चाव आणि गुलाब शेवाले या दोन शेजाऱ्यांनी पक्षांना पुढील भांडणापासून परावृत्त करण्यासाठी घटनास्थळी हस्तक्षेप केला. या संदर्भात, आय. ओ. ने नोंदवलेले अनिल

बच्चव यांचे विधान आणि पी. डब्ल्यू.- ३ म्हणून निशाणी "३८" खाली नोंदवलेले त्यांचे निवदेन हे अत्यंत गंभीर आणि महत्त्वपूर्ण आहे. खरे त्यांनी अभिसाक्ष दिली कि त्यांनी आणि गुलाब शेवळे यांनी भांडणात हस्तक्षेप केला आणि पक्षांमधील भांडण मिटवले. आठवड्याच्या विशिष्ट दिवशी त्यांच्या शेतातील कुटुंबाच्या विहिरीतून पाणी काढून सोडल्यामुळे कुटुंबातील सदस्यांमध्ये भांडण झाल्याचे त्यांनी सांगितले आहे. त्याने स्पष्टपणे सांगितले आहे की अर्जदाराने त्याच्यासोबत लोखंडी रॉड आणले नाही किंवा पीडितेला जखमी करण्यासाठी लोखंडी रॉडचा वापर केला नाही किंवा त्याच्या डोक्यावर कोणताही वार करून पीडितेला जखमी केले नाही. त्याचप्रमाणे पंच साक्षीदार असलेल्या पीडब्ल्यू-१ आणि पीडब्ल्यू-२ यांनीही अभियोग पक्षाच्या खटल्याचे समर्थन केलेले नाही.

**१६.** पीडब्ल्यू-३ या स्वतंत्र साक्षीदाराची अभियोग पक्षाने तपासणी केली आहे. त्यामुळे अभियोग पक्षाच्या प्रकरणात गंभीर त्रुटी आहे. प्रत्यक्ष साक्षीदार पीडब्ल्यू-३ ज्याने भांडणात हस्तक्षेप केला आणि पीडितेला वाचविले आणि जे गुन्हेगारीच्या ठिकाणी उपस्थित होते, त्यांनी अभियोग पक्षाच्या खटल्याचे समर्थन केले नाही. श्री. अनिल बच्चव यांची साक्ष लक्षात घेता, अभियोग पक्षाच्या खटल्यात अर्जदाराला दोषी ठरवण्याच्या मागणीमध्ये स्पष्ट विसंगती आहे कारण ती पीडितेने-पीडब्ल्यू-५ ने स्वतः त्याच्या उलट तपासणीत दिलेल्या कबुलीशी स्पष्टपणे जुळते आणि दुखापत कोणी केली आणि ती कशी झाली याबद्दल हा पुरावा स्पष्टपणे विसंगत आहे. याच विसंगतीमुळे इतर

३ आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.

**१७.** खालील विद्वान न्यायालयांनी पारित केलेल्या दोन्ही न्यायनिर्णयांना या गंभीर दुर्बलतेचा सामना करावा लागतो. अभियोग पक्षाने दिलेल्या पुराव्यांच्या आधारे अर्जदाराचा-आरोपी क्रमांक.१ चा गुन्हा स्पष्ट करण्यासाठी अभियोग पक्षाचा खटला सर्व वाजवी शंकांच्या पलीकडे सिद्ध झालेला नाही. प्रथम माहिती देणारा (पी. डब्ल्यू.-४), पीडित (पी. डब्ल्यू-५) आणि पी. डब्ल्यू-३ या अभियोग पक्षाच्या प्रमुख प्रत्यक्ष साक्षीदारांच्या पुराव्यांमध्ये स्पष्ट विसंगती आहे. पी. डब्ल्यू-४ आणि पी. डब्ल्यू-५ हे दोन्ही पत्नी आणि पती आणि इच्छुक पक्ष आहेत. केवळ वैद्यकीय पुराव्याच्या आधारावर अभियोग पक्ष आरोपींवर आरोप लावू शकत नाही. असे अनेक स्वतंत्र प्रत्यक्ष साक्षीदार होते ज्यांचा पुरावा अभियोग पक्षाने दिलेला नाही. जेव्हा पी. डब्ल्यू-३ या स्वतंत्र प्रत्यक्ष साक्षीदाराचा पुरावा तपासला जातो, तेव्हा तो अभियोग खटल्याच्या विरोधात बंड करतो कारण तो स्पष्टपणे सांगतो की अर्जदाराने पीडितेला कोणतीही दुखापत केली नाही आणि वापरलेल्या कथित शस्त्राच्या जप्ती नसल्यामुळे, अभियोग पक्षाचा खटला निष्फळ होतो.

**१८.** खालील विद्वान न्यायालयांनी पारित केलेल्या दोन्ही न्यायनिर्णय तथ्ये आणि अभियोग पक्षाचे साक्षीदारांच्या पुराव्यांवरील फौजदारी न्यायशास्त्राच्या चाचणीसाठी लागू होत नाहीत आणि म्हणूनच त्यात हस्तक्षेप करणे आवश्यक आहे. दिनांक

१३.१०.२०१४ आणि ०६.०८.२०२४ रोजीचे दोन्ही न्यायनिर्णय रद्दबातल केले जातात.

**१९.** परिणामी दिनांक ०६.०८.२०२४ रोजीचा आक्षेपित आदेश रद्दबातल केला जातो.

**२०.** वरील बाबी लक्षात घेता, फौजदारी पुनरीक्षण अर्ज मंजूर करण्यात येतेआणि वरील अटींमध्ये निकाली काढण्यात येते.

**२१.** अर्जदाराचे विद्वान वकीलाने न्यायालयाला कळविले की अर्जदार म्हणजे मूळ आरोपी क्रमांक.१ सध्या नाशिक रोड मध्यवर्ती कारागृहाच्या कोठडीत आहे. वरील बाबी लक्षात घेता, या न्यायनिर्णयाची सर्व्हर प्रत संबंधित तुरंगाधिकारी/अधीक्षक/प्रभारी, नाशिक रोड मध्यवर्ती कारागृह यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर, या न्यायालयाने नाशिक रोड मध्यवर्ती कारागृहातील तुरंगाधिकारी/अधीक्षक/प्रभारी यांना अर्जदाराला त्वरित सोडण्याचे आणि त्याला मुक्त करण्याचे निर्देश दिले आहेत.

**२२.** या न्यायालयाचे प्रबंधक (न्यायिक-१) या न्यायनिर्णयावर त्वरित कारवाई करतील आणि अर्जदाराच्या त्वरित सुटकेसाठी संबंधित तुरंगाधिकारी/अधीक्षक/प्रभारी, नाशिक रोड मध्यवर्ती कारागृहाला ते कळवतील.

**२३.** अर्जदाराचे कोणतेही जामीनपत्र असल्यास ते रद्द केले जातात . दिनांक २१.११.२०१४ रोजीचे प्रतिज्ञापत्र नोंदवण्यासाठी पाठविले जाते. पुनरीक्षण अर्जदाराने जेएमएफसी, मालेगाव येथे जमा केलेली २,०००/- रुपयांची दंडाची रक्कम जेएमएफसी

न्यायालय, मालेगावच्या रजिस्ट्रीद्वारे त्याला परत करण्याची परवानगी आहे, कारण या न्यायनिर्णयाची सर्व्हर प्रत न्यायालयासमोर ठेवली जात आहे.

**२४.** फौजदारी पुनरीक्षण अर्ज निकाली काढण्याची दृष्टीने , अंतरिम अर्ज क्रमांक.३७८४/२०२४ देखील त्यानुसार निकाली काढला जातो.

**२५.** सर्व संबंधितांनी या न्यायनिर्णयाच्या सर्व्हर प्रतीची अंमलबजावणी करावी.

**[ न्यायमूर्ती मिलिंद एन. जाधव.]**

## अस्वीकरण

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याचा/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल".